# गडचिरोली जिल्ह्याच्या रेती घाटांचा पर्यावरण व्यवस्थापन योजनेचा कार्यकारी सारांश

## (वाळू घाटांचे क्षेत्र- 1-4.99 हेक्टर)

## 70 वाळू घाटांसाठी जनसुनावणी

प्रकल्प प्रस्तावक

जिल्हा खनिकर्म अधिकारी, गडचिरोली

पर्यावरण सल्लागार


**M/s Anacon Laboratories Pvt. Ltd., Nagpur**

**QCI-NABET Accredited EIA Consultant for Mining of Minerals (Sector 1 1(a))**

**MoEF&CC (GOI) Recognized Laboratory**

**ISO 9001:2015, ISO 14001:2015, ISO 45001:2018**

Lab. & Consultancy: FP-34, 35, Food Park,
MIDC, Butibori, Nagpur – 441122
Email: *ngp@anacon.in*
Website: *www.anaconlaboratories.com*

# गडचिरोली जिल्ह्याच्या रेती घाटांचा पर्यावरण व्यवस्थापन योजनेचा कार्यकारी सारांश

## 1. प्रस्तावना

गडचिरोली जिल्हाधिकारी सन 2021-22 साठी जिल्ह्यातील वाळूच्या घाटांचा लिलाव करण्याची योजना आखत आहेत कारण वाळू ही पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मुख्य सामग्री आहे. ईआयए अधिसूचना 2006 नुसार खाण सुरू करण्यासाठी पूर्वी पर्यावरणीय मंजुरी आवश्यक आहे, म्हणून ईसीची प्रक्रिया म्हणून सार्वजनिक सुनावणी प्राथमिक टप्पा आहे.

महाराष्ट्र वाळू धोरण 03/09/2019 नुसार, जिल्हा खनिकर्म अधिकारी सुरुवातीला प्रकल्प प्रस्तावक आहेत आणि वाळू घाटांच्या लिलावानंतर पर्यावरणीय मंजुरी यशस्वी बोलीदाराकडे हस्तांतरित केली जाईल. एकूण 104 वाळू घाटांचे सर्वेक्षण केले गेले आहे परंतु 70 घाटांना EC साठी अंतिम रूप देण्यात आले आहे, तहसीलदारांच्या नेतृत्वाखालील तालुकास्तरीय तांत्रिक समिती मध्ये उपअभियंता सिंचन, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयाद्वारे नियुक्त कनिष्ठ भूवैज्ञानिक, G.S.D.A कनिष्ठ भूवैज्ञानिक गडचिरोली, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी यांचा सामावेश आहे.

### 1.1 प्रस्तावित वाळू घाटांचे वैशिष्ट्ये

वाळू खाणकाम मजुरान करवी ओपनकास्ट पद्धतीने फावडे, घमेली यांच्या सहाय्याने केले जाईल. खनन करण्यात आलेली वाळू मजुरांद्वारे ट्रॅक्टरट्रॉली मध्ये चढवण्यात येईल आणि घाट ते डेपोपर्यंत खनिजांची वाहतूक ट्रॅक्टरट्रॉलीच्या व्यवस्थेद्वारे प्रस्तावित आहे. खनिज कोरडे, खनन करण्या साठी योग्य असल्याने ड्रिलिंग व स्फोटांची आवश्यकता नाही आणि म्हणूनच हे प्रस्तावित नाही. वाळूचे उत्खननंतर, वाळू थेट वाहनांमध्ये चढवण्यात येईल.

वाळू उत्खनन मजुरांद्वारे करण्याचा प्रस्ताव आहे. यात पुढील चरणांचा समावेश आहे

i. नदी काठी वाळू खनन कामांमध्ये मातीचे उत्खनन सामील नसते.
ii. फावडे व घमेले वापरुन वाळू उत्खनन केले जाईल.
iii. ड्रिलिंग आणि ब्लास्टिंग आवश्यक नाही.
iv. लिलाव पत्र किंवा पर्यावरण मंजुरी मध्ये दिलेल्या कालावधीतच खाणकाम केले जाईल.
v. नदीच्या पात्रातून वाळूची वाहतूक ट्रॅक्टर-ट्रॉलीद्वारे केली जाईल.
vi. खाणकाम करताना कोणतीही यंत्रणा वापरली जाणार नाही
vii. प्रस्तावित वाळू घाटाची जागा पूर्णपणे कोरडी असल्याने आणि त्याला जोडणारे रस्तेही कोरडे व सुलभ असल्याने नदीच्या पात्रामधुन पाण्याचा उपसा करण्याचे प्रस्तावित नाही.

viii. नदीच्या मध्यभागी / तळाशी वाळूचा साठा होतो. लीजच्या संपूर्ण कालावधीत तालुका समितीच्या संयुक्त सर्वेक्षणानुसार सुचविलेल्या जास्तीत जास्त खनन योग्य खोलीपर्यंत वरच्या पृष्ठभागापासून काम केले जाईल.

ix. उत्खनन केलेल्या वाळूची संपूर्ण मात्रा वाहतूक केली जाईल आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापरली जाईल. खाणकामातून कोणत्याही घनकचऱ्याची उत्सर्जन होणार नाहीत, केवळ कामगारांकडून खाल्ल्या जाणाऱ्या पदार्थांच्या प्लास्टिकच्या रॅपर्सच्या वापरामुळे घनकचरा फारच कमी प्रमाणात होईल परंतु तो स्वतंत्रपणे गोळा केला जाईल आणि जवळील कचरा संकलन केंद्रा मध्ये नेला जाईल.

x. मंजूर खाणकाम योजनेनुसार खाणकाम केले जाईल.

xi. प्रस्तावित प्रकल्प कार्यात स्थानिक लोकांना नोकरी देण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावित वाळू घाटातून थेट रोजगाराचा उल्लेख यासह जोडलेल्या यादीमध्ये देण्यात आला आहे.

वाळू घाटांचे तपशील **टेबल 01** मध्ये जोडलेले आहेत:

## 2.0 आसपासच्या वातावरणावर परिणाम आणि शमन उपाययोजना

### 2.1 सामान्य:

खाणकाम  प्रकल्पांचा पर्यावरणाच्या विविध घटकांवर परिणाम होऊ शकतो उदा. हवा, पाणी, आवाज, जमीन, जैविक पर्यावरण आणि सामाजिक-अर्थशास्त्र. वाळू घाट प्रकल्पां मुळे होणारे परिणाम आणि त्यांचे शमन उपाय खालीलप्रमाणे आहेत.

### 2.2 भू पर्यावरण:

नियोजित खाण प्रक्रिये पेक्षा वेगळे खान काम केल्यास नदी काठाची झीज / धूप होऊ शकते आणि त्याद्वारे नदीचे प्रवाह मार्ग बदलू शकतो, ज्यामुळे मालमत्तेचे नुकसान होते आणि आजूबाजूच्या परिसराचा ऱ्हास होतो.

**शमन उपाय**:

- खाण योजनेनुसार वाळू घाट क्षेत्रात वाळू उपसा होईल.
- खाणकाम फक्त नदीच्या घाटा पुरतेच मर्यादित राहील आणि बाह्यभागातील कोणत्याही स्थलाकृति किंवा आजूबाजूच्या प्रवाहावर परिणाम होणार नाही.

- वाळू उत्खननाच्या प्रस्तावासाठी कोणताही पाण्याचा प्रवाह वळविला जाणार नाही.
- महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व नियमन) नियम 2013 मधील सर्व तरतुदींचे सावधपणे पालन केले जाईल.

MoEF आणि CC ने जारी केलेल्या शाश्वत वाळू उत्खनन मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या विविध बाबींचे पालन करणे आवश्यक राहील .

## 2.3 जल पर्यावरण

वैज्ञानिक पद्धतीने वाळू उत्खनन न केल्यामुळे नैसर्गिक नाले, पाण्याचा प्रवाह आणि भूगर्भातील जल प्रवाह यांच्या वरती विपरीत परिणाम होऊ शकतो. प्रकल्प क्षेत्रात वाळूचे जास्त उत्खनन झाल्यास भूगर्भातील पाण्याची पातळी कमी झाल्याने उन्हाळ्याच्या हंगामात दुष्काळ पडतो आणि शेती, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न इत्यादी सर्व बाबतीत सार्वजनिक जीवनावर परिणाम होतो. मासे, कोळंबी आणि इतर जलचर जीवनावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

**शमन उपाय**:

- प्रकल्पांमध्ये कोणताही जल प्रवाह वळविणे किंवा तोडणे प्रस्तावित नाही.
- नदीतून पाणी उपसा करण्यासाठी किंवा भूगर्भातील पाण्याचे वापर करण्याबाबत कोणत्याही प्रस्तावाची मागणी करण्यात आलेली नाही.
- उन्हाळ्याच्या दिवसान मध्ये , प्रस्तावित वाळू उत्खनना मुळे नदीच्या पाण्याचा प्रवाह उघड होणार नाही आणि म्हणूनच, या प्रकल्पामुळे पृष्ठभाग वरील जलस्त्रोत आणि भूजल प्रणालीवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.
- प्रकल्प प्रस्तावकाने वाळू काढण्याच्या कालावधीत प्रस्तावित खाणकामांच्या योग्य आणि वैज्ञानिक पद्धतीसाठी सर्व मार्गदर्शक तत्त्वे आणि नियम पाळले जातील याची दक्षता घ्यावी.
- वाळू उत्खनन केवळ कोरड्या नदीपात्राच्या भागातच केले जाईल.

संयुक्त सर्वेक्षण अहवालाच्या अनुषंगाने वाळूचे उत्खनन योग्य पद्धतीने करता येईल. भूजल पातळीला कोणताही धक्का लावला जाणार नाही.

## 2.4 वायू पर्यावरण :

नदी पात्रात खाण कामांमध्ये, वाहन हे कण आणि वायू प्रदूषक घटकांचे स्रोत आहे, तर वाळूचे धूळ कण विशेषत: वाळू tractar मध्ये भरताना आणि वाहतुकीदरम्यान कण प्रदूषक म्हणून काम करतात.

सर्वसाधारणपणे SPM (Suspended Particulate Matters $PM_{10}$) आणि मर्यादित प्रमाणात सल्फर डायऑक्साइड (SO2) आणि नायट्रस ऑक्साईड्स (NOx) जीवाश्म इंधन-आधारित वाहनांमुळे उत्सर्जित होतील व फक्त मर्यादित क्षेत्र मध्येच दिलेल्या मर्यादेमध्ये असू शकतील कारण वाळू उत्खनन लहान प्रमाणात आहे. खनन कार्यामुळे उत्पन्न झालेली धूळ श्वासा द्वारे शरीरात गेल्यास आरोग्यास हानिकारक आहे. खनन आणि वाहतुकीदरम्यान निर्मित होणारया धूळ निर्मितीसाठी काही प्रमाणात शमन उपाय आवश्यक आहे.

**शमन उपाय**:

- खनन क्षेत्र व नदीकाठच्या रस्त्यावर पाणी शिंपडण्यासारखे योग्य उपाय अवलंबिले जातील आणि धूळ उत्सर्जनावर नियंत्रण ठेवले जाईल.
- ट्रॅक्टर ट्रॉलीचे अत्यधिक लोडिंग आणि परिणामी रस्त्यांवर होणारे गळती टाळली जाईल.
- भारित ट्रॉलीवर ताडपत्री झाकण्यासारखे उपाय वाळूची नासाडी व सांडण्या पासून रोखू शकतील.
- हे सुनिश्चित केले जाईल की सर्व वाहतूक वाहने वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र घेतील.
- जवळपासच्या गावांमध्ये धूळीचा प्रसार कमी करण्यासाठी कच्च्या रस्त्याच्या कडेला झाडे लावण्यात येतील.
- सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचे परीक्षण करण्यासाठी नियतकालिक देखरेखीचा प्रस्ताव ठेवला जाईल.

## 2.5 ध्वनी पर्यावरण

वाळू उत्खनन मॅन्युअल पद्धतीने केले जाईल, त्यामुळे खाणकाम करताना आवाज निघणार नाही, तथापि घाटात वाहतुकीसाठी वापरल्या जाणा ट्रॅक्टरच्या हालचालीतून आवाज निर्माण होईल.

**शमन उपाय**:

- प्रकल्प ठिकाणी मॅन्युअल उत्खननास परवानगी आहे, नदीपात्रात कोणतीही यंत्रणा तैनात केली जाणार नाही.
- वाहतुकीमुळे उद्भवणारा आवाज परवानगीच्या क्षेत्र मध्येच मर्यादेमध्ये नियंत्रित केला जाईल.
- मर्यादित कामकाजाचे तास. सकाळी 6 ते सायंकाळी 6 या वेळेत वाळू उत्खनन कामे होतील.

## 2.6 जैविक पर्यावरण

अनियंत्रित व अवैज्ञानिक वाळू उत्खननामुळे जलीय आणि किनारपट्टीच्या जिवांचा नाश होतो.

- **स्थलीय पर्यावरणशास्त्र**

वनस्पति: हे क्षेत्र पूर्णपणे नापीक आहे आणि नदीपात्रात कोणत्याही महत्त्वपूर्ण वनस्पति नाहीत. लीज क्षेत्र पूर्णपणे वाळूने व्यापलेले आहे आणि कोणत्याही झाडाची प्रजाती नाहीत, केवळ काही गवत थोड्या फार प्रमाणात आढळते. तर, खाणीच्या कामकाजामुळे कुठल्याही झाडाला तोडण्याची शक्यता/परवानगी नाही.

**जीवशास्त्र:** वाळू घाट क्षेत्रात वनक्षेत्र नसल्यामुळे या भागात कोणतेही वन्यजीव दिसून येत नाही. अशा प्रकारे लीज क्षेत्रातील जैविक वातावरणावर नदीच्या खाण उत्खनन प्रकल्पाचा कोणताही विशेष परिणाम होणार नाही.

- **पाण्यातील पर्यावरण**

खाणकाम फक्त पाण्याच्या पातळी वरती मर्यादित राहिल आणि भूजल प्रवाहाला धक्का लागणार नाही यामुळे विद्यमान जलचर (घाटा पासून दूर) प्रहावाच्या दिशेने असलेल्या भाग मध्ये सुद्धा कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही.

**शमन उपाय**:

- पावसाळ्याच्या हंगामात म्हणजेच 10 जून ते 30 सप्टेंबर या कालावधीत कोणत्याही खाणकाम केले जाणार नाही, जेणेकरून मुख्यत: पैदास हंगामातील जलीय जीवनावरील परिणाम कमीत कमी होईल.
- जलचर व माशांच्या हालचालींवर वर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून नदीपात्राच्या कोरड्या भागावर खाणकाम केले जाईल.

## 2.7 वृक्षारोपण

संपूर्ण खाण क्षेत्र नदीच्या पात्रात येते आणि पावसाळ्यात पूर आल्यामुळे खनन पट्टा पाण्याखाली असतो; म्हणून या भागात कोणत्याही प्रकारचे वृक्षारोपण करणे शक्य नाही. ग्रामपंचायतीच्या सूचनेनुसार मुख्यतः वाहतूक रस्ते व नदीकाठ किंवा खाणकाम क्षेत्राला जोडणाऱ्या रस्त्याच्या बाजूने वृक्षारोपण केले जाईल. विविध प्रकारच्या प्रजातींसह किती झाडे लावली जातील हे संलग्न यादीमध्ये नमूद केले आहे. आंबा, कडुनिंब, नीलगिरी, पीपल, गुलमोहर आणि इतर स्थानिक प्रजाती योग्य संयोगाने निवडली जातील जेणेकरून ते लवकर वाढू शकतील आणि पानांचे चांगले आवरण असेल.

## 2.8 व्यावसायिक आरोग्य

1. कामगारांसाठी आरोग्य तपासणीचा कार्यक्रम वेळोवेळी हाती घेतला जाईल.
2. प्रस्तावित खाण क्षेत्रा मध्ये प्रथमोपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

## 3.0 इतर सुरक्षिततेचे अभ्यास

1. सक्रिय वाळू घाटावर अनधिकृत प्रवेश टाळण्यासाठी वाहतूक रस्त्याला कुंपण घालणे प्रस्तावित आहे.
2. वाळू उत्खननासंदर्भात सर्व माहिती दाखविणाऱ्या बोर्डांची तरतूद, प्रमाण, खाणकामांचा कालावधी व प्रकल्प प्रस्तावाचा तपशील यांचा समावेश असेल.
3. प्रमुख ठिकाणी सूचना दर्शक तसेच चेतावणी दर्शक बोर्ड लावले जातील.
4. वाळू घाटाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती व देखभाल वेळोवेळी केली जाईल.
5. पुरेशी सुरक्षा व्यवस्था तैनात असेल.
6. कामगारां साठी सुरक्षा उपकरणांची तरतूद करण्यात येईल.
7. कचरा किंवा इतर कोणतीही सामग्री जाळण्यासाठी कोणत्याही इंधनाचा वापर करण्यास मनाई असेल.
8. घरगुती घनकचरा गोळा व विल्हेवाट लावण्यासाठी पुरेशी तरतूद केली जाईल.
9. वाळूघाट येथे कामात असलेल्या कामगारांना सुरक्षा व आरोग्याबाबत जागरूक केले जाईल.

## 4.0 वैधानिक आवश्यकता

प्रभावी संसाधन व्यवस्थापन एकल पद्धतीने केले जाऊ शकत नाही. खनन विभाग समन्वय व एकीकरण होण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करेल, जेणेकरून समन्वयित नियामक यंत्रणा राबविली जाऊ शकेल.

नियामक प्रणालीमध्ये वैधानिक आणि बिगर वैधानिक घटक असतात. अपेक्षित आणि खाणकामाच्या विभाग-विशिष्ट रणनीतीमध्ये, विभाग एकात्मिक पर्यावरणीय व्यवस्थापन प्रणालीमध्ये भाग घेतो जे अधिनियम आणि नियमांनुसार प्रशासित केले जाते. पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षणाशी निगडित आणि खाण प्राधिकरणाच्या धारकास ज्या संबंधित गोष्टी आहेत त्यासंबंधित इतर कायद्यांमध्ये पुढील गोष्टींचा देखील अंतर्भाव असू शकतो:

- महाराष्ट्र राज्य वाळू धोरण 2019
- Sustainable sand mining and management Guidelines, MoEF आणि CC, 2016.
- महाराष्ट्र गौण खनिज उतारा विकास आणि नियमन) नियम, 2013
- पर्यावरण (संरक्षण) कायदा, 1986
- Enforcement and Monitoring Guidelines for Sand mining, MoEF & CC, 2020
- मा. एन.जी.टी. चे निर्णय आणि माननीय भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय.

# तक्ता 01: प्रस्तावित रेती घाटांचा तपशील 2021-22

| अ. क्र. | तालुका | गाव | गाव/रेतीघाटा चेनाव | नदीचेनाव | सर्व्हेक्र./गटक्र | लांबी(मी) | रुंदी(मी) | खोली(मी) | क्षेत्रफळ चौ.मी | क्षेत्रफळ (हे.) | प्रमाण (ब्रास) | रस्त्या चीलांबी (मी) | रस्त्याची रुंदी (मी) | एकूणवृक्षारोपण | ट्रॅक्टर | मनुष्य बळ | एकूण पाणी (कि. ली./दिवशी ) | EMP खर्च लाख रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | गडचिरोली | दिभनाचक | दिभनाचक | कठानी नदी | 82, 83 | 200 | 50 | 0.7 | 10000 | 1.00 | 2473 | 752 | 3 | 852 | 5 | 21 | 17.13 | 6,41,800/- |
| 2. | गडचिरोली | आंबेशिवणी | आंबेशिवणी (राममंदिर घाट) | कठानी नदी | 319, 320 | 200 | 60 | 0.5 | 12000 | 1.20 | 2120 | 1544 | 3 | 1644 | 4 | 21 | 33.76 | 9,88,600/- |
| 3. | गडचिरोली | बोदलीमाल | बोदलीमाल | कठानी नदी | 135/46, 135/34 | 300 | 60 | 0.5 | 18000 | 1.80 | 3180 | 1234 | 2.5 | 1384 | 7 | 37 | 25.02 | 8,81,600/- |
| 4. | गडचिरोली | अडपली | अडपली-1 | कठानी नदी | 41, 42 | 250 | 70 | 0.5 | 17500 | 1.75 | 3092 | 670 | 3 | 795 | 6 | 32 | 15.94 | 6,30,500/- |
| 5. | गडचिरोली | लांझेडा | लांझेडा | कठानी नदी | 347, 345, 342, 341 | 125 | 80 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | 1593 | 2.8 | 1656 | 4 | 21 | 32.97 | 10,93,400/- |
| 6. | गडचिरोली | आंबेशिवणी | आंबेशिवणी ( गायघाट ) | कठानी नदी | 305, 352, 353 | 150 | 50 | 0.5 | 7500 | 0.75 | 1325 | 998 | 3 | 1073 | 3 | 16 | 21.97 | 8,04,700/- |
| 7. | गडचिरोली | राजगाटामाल | राजगाटामाल | कठानी नदी | 296, 297 | 200 | 50 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | 1023 | 3 | 1123 | 4 | 21 | 22.82 | 7,60,200/- |
| 8. | गडचिरोली | खुर्सा | खुर्सा | कठानी नदी | 131, 130, 129, 128 | 150 | 80 | 0.5 | 12000 | 1.20 | 2120 | 1089 | 3 | 1164 | 4 | 21 | 24.05 | 7,82,100/- |
| 9. | गडचिरोली | कुरखेडा | कुरखेडा | कठानी नदी | 18, 15, 14 | 125 | 100 | 1 | 12500 | 1.25 | 4417 | 1103 | 3 | 1166 | 9 | 47 | 25.18 | 9,31,900/- |
| 10. | गडचिरोली | कनेरी | कनेरी | वैनगंगा नदी | 320, 321, 323, 332 | 250 | 160 | 0.5 | 40000 | 4.00 | 7067 | 1295 | 2.8 | 1420 | 15 | 78 | 29.38 | 11,77,000/- |
| 11. | गडचिरोली | साखरा | साखरा | वैनगंगा नदी | 456, 457, 458, 480, 567 | 300 | 70 | 0.7 | 21000 | 2.10 | 5194 | 846 | 2.5 | 996 | 11 | 58 | 18.58 | 9,22,400/- |
| 12. | गडचिरोली | पोर्ला | पोर्ला | वैनगंगा नदी | 752 | 300 | 100 | 0.5 | 30000 | 3.00 | 5300 | 4006 | 2.5 | 4156 | 11 | 58 | 77.04 | 23,29,400/- |
| 13. | गडचिरोली | नगरी | नगरी | वैनगंगा नदी | 433, 435, 436, 437 | 300 | 150 | 1 | 45000 | 4.50 | 15901 | 1440 | 3 | 1590 | 33 | 171 | 37.13 | 16,74,500/- |
| 14. | गडचिरोली | काटली | काटली | वैनगंगा नदी | 201, 204 | 300 | 120 | 1 | 36000 | 3.60 | 12721 | 844 | 3 | 994 | 26 | 135 | 23.35 | 11,58,600/- |
| 15. | धानोरा | राजोली | राजोली | कठानी नदी | 170, 171, 172 | 275 | 40 | 0.6 | 11000 | 1.10 | 2332 | 1192 | 3 | 1330 | 5 | 27 | 26.80 | 9,65,500/- |
| 16. | चामोर्शी | जैरामपूर | जैरामपूर रेतीघाट | वैनगंगा नदी | 25, 26, 28 | 200 | 150 | 0.5 | 30000 | 3.00 | 5300 | 1211 | 3 | 1311 | 11 | 58 | 28.06 | 11,29,900/- |
| 17. | चामोर्शी | गणपूर रै | गणपूर रै रेतीघाट | वैनगंगा नदी | 490, 491, 488, 489 | 120 | 100 | 0.4 | 12000 | 1.20 | 1696 | 657 | 3 | 717 | 4 | 21 | 14.89 | 6,32,800/- |
| 18. | चामोर्शी | दोटकुली | दोटकुली रेतीघाट | वैनगंगा नदी | 114, 118, 119 | 250 | 80 | 0.7 | 20000 | 2.00 | 4947 | 1020 | 3 | 1145 | 10 | 52 | 23.99 | 9,82,500/- |
| 19. | चामोर्शी | वाघोली | वाघोली रेतीघाट | वैनगंगा नदी | 53, 54, 55 | 200 | 100 | 0.5 | 20000 | 2.00 | 3534 | 817 | 3 | 917 | 7 | 37 | 19.05 | 7,79,800/- |
| 20. | चामोर्शी | मोहुर्ली मो | मोहुर्ली मो रेतीघाट उसेगांव | वैनगंगा नदी | 56, 60 | 200 | 100 | 0.5 | 20000 | 2.00 | 3534 | 683 | 2.5 | 783 | 7 | 37 | 14.53 | 7,06,200/- |
| 21. | चामोर्शी | मोहुर्ली मो | मोहुर्ली मो रेतीघाट | वैनगंगा नदी | 95, 96 | 200 | 100 | 0.7 | 20000 | 2.00 | 4947 | 1074 | 3.2 | 1174 | 10 | 52 | 26.05 | 10,49,100/- |

| अ. क्र. | तालुका | गाव | गाव/रेतीघाटा चेनाव | नदीचेनाव | सर्व्हेक्र./गटक्र | लांबी(मी) | रुंदी(मी) | खोली(मी) | क्षेत्रफळ चौ.मी | क्षेत्रफळ (हे.) | प्रमाण (ब्रास) | रस्त्या चीलांबी (मी) | रस्त्याची रुंदी (मी) | एकूणवृक्षारोपण | ट्रॅक्टर | मनुष्य बळ | एकूण पाणी (कि. ली./दिवशी ) | EMP खर्च लाख रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिबंगांव | | | | | | | | | | | | | | | |
| 22. | चामोर्शी | आमगाव म | आमगाव म रेतीघाट | पोहार नदी | 244, 245, 239 | 110 | 100 | 0.5 | 11000 | 1.10 | 1943 | 740 | 3 | 795 | 4 | 21 | 16.61 | 6,84,000/- |
| 23. | मुलचेरा | येला | येला | प्राणहिता नदी | 226, 225 | 100 | 100 | 0.7 | 10000 | 1.00 | 2473 | 1138 | 3 | 1188 | 5 | 27 | 25.14 | 9,47,200/- |
| 24. | आरमोरी | अरसोडा | अरसोडा रेतीघाट | वैनगंगा नदी | 386, 384, 383 | 225 | 200 | 1 | 45000 | 4.50 | 15901 | 917 | 2.8 | 1030 | 33 | 171 | 25.00 | 14,44,800/- |
| 25. | आरमोरी | वघाळा | वघाळा रेतीघाट | वैनगंगा नदी | 34, 11, 6, 5 | 225 | 200 | 1 | 45000 | 4.50 | 15901 | 184 | 2.8 | 297 | 33 | 171 | 10.34 | 10,91,600/- |
| 26. | आरमोरी | सायगांव | सायगांव रेतीघाट | वैनगंगा नदी | 351, 352, 353, 356/1 | 170 | 90 | 1 | 15300 | 1.53 | 5406 | 550 | 3 | 635 | 11 | 58 | 14.09 | 7,65,500/- |
| 27. | आरमोरी | शिवणी बुज | शिवणी बुज रेतीघाट 1 | वैनगंगा नदी | 88, 87, 86, 85, 82, 81, 71 | 350 | 100 | 1 | 35000 | 3.50 | 12367 | 1186 | 3 | 1361 | 26 | 135 | 30.68 | 14,28,400/- |
| 28. | आरमोरी | शिवणी बुज | शिवणी बुज रेतीघाट 2 | वैनगंगा नदी | 725, 724, 722, 721, 720, 714 | 250 | 100 | 1 | 25000 | 2.50 | 8834 | 424 | 3 | 549 | 18 | 94 | 12.94 | 8,24,100/- |
| 29. | आरमोरी | रामपूर चक | रामपूर चक रेतीघाट | गाढवी नदी | 178/1, 178/2, 179 | 300 | 50 | 0.8 | 15000 | 1.50 | 4240 | 922 | 2.8 | 1072 | 9 | 27 | 20.29 | 8,40,800/- |
| 30. | आरमोरी | देऊळगांव | देऊळगांव -1 रेतीघाट | वैनगंगा नदी | 156 | 250 | 100 | 1 | 25000 | 2.50 | 8834 | 1004 | 3 | 1129 | 18 | 94 | 25.12 | 11,56,100/- |
| 31. | आरमोरी | देऊळगांव | देऊळगांव -2 रेतीघाट | खोब्रागडी नदी | 170 | 200 | 50 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | 855 | 3 | 955 | 4 | 21 | 19.29 | 7,68,000/- |
| 32. | आरमोरी | वनखी | वनखी रेतीघाट | खोब्रागडी नदी | 113 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 596 | 3 | 696 | 15 | 78 | 15.85 | 8,00,900/- |
| 33. | देसाईगंज | कुरुड | कुरुड (बोडेगांवघाट) | वैनगंगा नदी | 335, 336, 337 | 100 | 100 | 0.7 | 10000 | 1.00 | 2473 | 544 | 3 | 594 | 5 | 27 | 12.67 | 6,64,100/- |
| 34. | देसाईगंज | कुरुड | कुरुड (जुनी वडसाघाट) | वैनगंगा नदी | 496/1, 496/2, 496/3 | 100 | 100 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | | | 50 | 4 | 21 | 1.04 | 8,98,100/- |
| 35. | देसाईगंज | कोंढाळा | कोंढाळा मेंढा घाट | वैनगंगा नदी | 332, 333, 334, 335, 336, 337, 338 | 380 | 130 | 1 | 49400 | 4.94 | 17456 | 661 | 2.8 | 851 | 36 | 186 | 20.87 | 13,01,400/- |
| 36. | देसाईगंज | कोंढाळा | कोंढाळा सिंड्राई घाट | वैनगंगा नदी | 280, 281 | 125 | 80 | 1 | 10000 | 1.00 | 3534 | 1566 | 2.5 | 1629 | 7 | 37 | 30.64 | 11,46,100/- |
| 37. | देसाईगंज | वडसा | वडसा | वैनगंगा नदी | 625, 626, 628 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 1430 | 3 | 1530 | 15 | 78 | 33.36 | 12,97,800/- |
| 38. | देसाईगंज | आमगाव | आमगाव | वैनगंगा नदी | 283, 284, 285, 286, 289, 755 | 200 | 100 | 0.6 | 20000 | 2.00 | 4240 | 900 | 2.8 | 1000 | 9 | 47 | 20.25 | 7,73,500/- |
| 39. | कुरखेडा | कुरखेडा | कुरखेडा रेतीघाट | सती नदी | 6 | 200 | 50 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | 130 | 3 | 230 | 4 | 21 | 4.07 | 4,13,000/- |

| अ. क्र. | तालुका | गाव | गाव/रेतीघाटा चेनाव | नदीचेनाव | सर्व्हेक्र./गटक्र | लांबी(मी) | रुंदी(मी) | खोली(मी) | क्षेत्रफळ चौ.मी | क्षेत्रफळ (हे.) | प्रमाण (ब्रास) | रस्त्या चीलांबी (मी) | रस्त्याची रुंदी (मी) | एकूणवृक्षारोपण | ट्रॅक्टर | मनुष्य बळ | एकूण पाणी (कि. ली./दिवशी ) | EMP खर्च लाख रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 40. | कुरखेडा | कुंभीटोला | कुंभीटोला रेती घाट | सती नदी | 77, 78 | 200 | 50 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | 260 | 3 | 360 | 4 | 21 | 6.80 | 4,65,000/- |
| 41. | कुरखेडा | घाटी | घाटी रेतीघाट | सती नदी | 139, 140 | 200 | 60 | 0.5 | 12000 | 1.20 | 2120 | 685 | 3 | 785 | 4 | 21 | 15.72 | 6,45,000/- |
| 42. | सिरोंचा | मेडाराममाल | मेडाराममाल नाला | मेडाराममाल नाला | 266 | 200 | 50 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | 1393 | 3 | 1493 | 4 | 21 | 30.59 | 9,58,200/- |
| 43. | सिरोंचा | तिमलगुडम | तिमलगुडम नाला | तिमलगुडम नाला | 17, 19 | 120 | 50 | 0.5 | 6000 | 0.60 | 1060 | 982 | 3 | 1042 | 2 | 11 | 21.37 | 7,66,800/- |
| 44. | सिरोंचा | चिपूरदूब्बा रै | चिपूरदूब्बा रै नं.1 | चिपूरदूब्बा नाला | 5/2, 4/2 | 200 | 50 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | 212 | 3.5 | 312 | 4 | 21 | 6.32 | 4,35,800/- |
| 45. | सिरोंचा | चिपूरदूब्बा रै | चिपूरदूब्बा रै न.2 | चिपूरदूब्बा नाला | 30 | 200 | 50 | 0.5 | 10000 | 1.00 | 1767 | 590 | 3.5 | 690 | 4 | 21 | 15.20 | 5,87,000/- |
| 46. | सिरोंचा | नगरम | नगरम | गोदावरी नदी | 529, 530, 601 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 630 | 3.5 | 730 | 15 | 78 | 18.14 | 7,29,500/- |
| 47. | सिरोंचा | मद्यीकुंठा | मद्यीकुंठा | गोदावरी नदी | 442, 443, 440, 441 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 868 | 3 | 968 | 15 | 78 | 21.56 | 8,34,700/- |
| 48. | सिरोंचा | आरडा | आरडामाल | गोदावरी नदी | 332, 335, 336, 434 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 1197 | 3 | 1297 | 15 | 78 | 28.47 | 9,86,300/- |
| 49. | सिरोंचा | अंकिसामाल | अंकिसामाल-1 | गोदावरी नदी | 246, 244, 233, 231, 230, 216, 214 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 2780 | 3 | 2880 | 15 | 78 | 61.71 | 18,51,000/- |
| 50. | सिरोंचा | अंकिसामाल | अंकिसामाल-2 | गोदावरी नदी | 234, 233, 330 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 2666 | 3 | 2766 | 15 | 78 | 59.32 | 18,05,400/- |
| 51. | सिरोंचा | चिंतरवेला | चिंतरवेला-1 | गोदावरी नदी | 606, 609 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 1172 | 3 | 1272 | 15 | 78 | 27.94 | 11,47,800/- |
| 52. | सिरोंचा | चिंतरवेला | चिंतरवेला-2 | गोदावरी नदी | 649, 650 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 2014 | 4 | 2114 | 15 | 78 | 55.69 | 15,24,600/- |
| 53. | सिरोंचा | मुकडीगटा रै | मुकडीगटा रै-1 | गोदावरी नदी | 85 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 2008 | 3 | 2108 | 15 | 78 | 45.50 | 14,82,200/- |
| 54. | सिरोंचा | मुकडीगटा रै | मुकडीगटा रै-2 | गोदावरी नदी | 91, 96 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 1923 | 3 | 2023 | 15 | 78 | 43.71 | 11,82,200/- |
| 55. | सिरोंचा | टेकडामोटला | टेकडामोटला-1 | गोदावरी नदी | 127 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 1923 | 3 | 816 | 15 | 78 | 18.37 | 7,93,900/- |
| 56. | सिरोंचा | टेकडामोटला | टेकडामोटला-2 | गोदावरी नदी | 130 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 1472 | 3 | 1572 | 15 | 78 | 34.24 | 11,36,300/- |
| 57. | सिरोंचा | रेगुंठामाल | रेगुंठामाल-1 | प्राणहिता नदी | 132 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 2348 | 2.8 | 2448 | 15 | 78 | 50.29 | 14,96,600/- |
| 58. | सिरोंचा | कोटापली | कोटापली | प्राणहिता नदी | 378 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 1307 | 2.5 | 1407 | 15 | 78 | 27.51 | 10,20,300/- |
| 59. | सिरोंचा | कोटामाल | कोटामाल | प्राणहिता नदी | 124, 125, 126 | 200 | 100 | 1 | 20000 | 2.00 | 7067 | 797 | 3 | 897 | 15 | 78 | 20.07 | 7,76,300/- |

| अ. क्र. | तालुका | गाव | गाव/रेतीघाटाचेनाव | नदीचेनाव | सर्व्हेक्र./गटक्र | लांबी(मी) | रुंदी(मी) | खोली(मी) | क्षेत्रफळ चौ.मी | क्षेत्रफळ (हे.) | प्रमाण (ब्रास) | रस्त्या चीलांबी (मी) | रस्त्याची रुंदी (मी) | एकूणवृक्षारोपण | ट्रॅक्टर | मनुष्य बळ | एकूण पाणी (कि. ली./दिवशी ) | EMP खर्च लाख रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 60. | भामरागड | येचली | येचली रेतीघाट | इंद्रावती नदी | 497, 498 | 100 | 100 | 0.6 | 10000 | 1.00 | 2120 | 977 | 2.8 | 1027 | 4 | 21 | 20.58 | 7,21,800/- |
| 61. | भामरागड | रेला | रेला रेतीघाट | इंद्रावती नदी | 43,41 | 100 | 100 | 0.8 | 10000 | 1.00 | 2827 | 777 | 3 | 827 | 6 | 32 | 17.74 | 6,55,800/- |
| 62. | अहेरी | आवलमारी | आवलमारी रेतीघाट | प्राणहिता नदी | 263, 86 | 140 | 80 | 1 | 11200 | 1.12 | 3958 | 485 | 3 | 555 | 8 | 43 | 12.11 | 5,56,000/- |
| 63. | अहेरी | वट्रा खु.स | वट्रा खु.स | प्राणहिता नदी | 22, 24 | 130 | 90 | 1 | 11700 | 1.17 | 4134 | 75 | 3 | 140 | 9 | 48 | 3.65 | 3,85,500/- |
| 64. | गडचिरोली | अडपली | अडपली-2 | कठानी नदी | 36 | 150 | 70 | 0.5 | 10500 | 1.05 | 1855 | 626 | 3 | 701 | 4 | 21 | 14.33 | 4,44,600/- |
| 65. | कुरखेडा | नान्ही | नान्ही रेतीघाट | सती नदी | 122, 123, 120 | 300 | 60 | 0.5 | 18000 | 1.80 | 3180 | 362 | 3 | 512 | 7 | 37 | 9.80 | 4,87,800/- |
| 66. | देसाईगंज | सावंगी | सावंगी | वैनगंगा नदी | 210, 217, 218, 219, 220, 221, 222,व 223 | 376 | 125 | 1 | 47000 | 4.70 | 16608 | 390 | 3 | 578 | 34 | 177 | 15.51 | 8,80,200/- |
| 67. | गडचिरोली | पारडीकुपी | पारडीकुपी | वैनगंगा नदी | 766, 767, 768 | 200 | 100 | 0.5 | 20000 | 2 | 3534 | 1040 | 3 | 1140 | 7 | 37 | 23.74 | 7,84,000/- |
| 68. | गडचिरोली | पुलखल | पुलखल | वैनगंगा नदी | 387, 388 | 230 | 100 | 1 | 23000 | 2.3 | 8127 | 1171 | 3 | 1286 | 17 | 90 | 28.43 | 9,38,900/- |
| 69. | आरमोरी | किटाळी | किटाळी रेतीघाट | वैनगंगा नदी | 80, 81 | 100 | 100 | 1 | 10000 | 1 | 3534 | 1500 | 2.8 | 1550 | 7 | 37 | 31.60 | 10,38,000/- |
| 70. | आरमोरी | डोंगरसावंगी | डोंगरसावंगी रेतीघाट | वैनगंगा नदी | 19, 20, 21 | 300 | 100 | 1 | 30000 | 3 | 3535 | 1446 | 3 | 1596 | 7 | 37 | 32.56 | 11,31,400/- |